बुधवार दि.२७ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ८१

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 | Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

## माझ्या समर्थनार्थ कुणीही एकत्र येऊ नये

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सत्तेस्थापने पूर्वी शिवसैनिकांना महत्त्वाचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क
मुंबई (वृत्तसंस्था)

एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करावे, अशी मागणी शिंदेसेनेचे नेते आणि कार्यकर्त्यांमधून होत आहे. एकनाथ शिंदे यांचा चेहरा समोर ठेवून महायुतीने निवडणूक लढवली. त्यामुळे एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री पद द्यावे असा दावा कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी एक ट्विट करत शिवसैनिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी वर्षा निवासस्थान किंवा अन्य कुठेही एकत्र जमू नये, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले आहे.महायुतीच्या प्रचंड विजयानंतर राज्यात पुन्हा एकदा आपले सरकार स्थापन होणार आहे. महायुती म्हणून आपण एकत्रित निवडणूक लढवली आणि आजही एकत्रच आहोत. माझ्यावरील प्रेमापोटी काही मंडळींनी सर्वांना एकत्र जमण्याचे, मुंबईत येण्याचे आवाहन केले आहे. तुमच्या या प्रेमासाठी मी अत्यंत मनापासून ऋणी आहे. मात्र अशा पद्धतीने माझ्या समर्थनार्थ कुणीही एकत्र येऊ नये, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी शिवसैनिकांना केले आहे. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी वर्षा निवासस्थान किंवा अन्य कुठेही एकत्र जमू नये, अशी विनंतीही एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना केली. तसेच समर्थ आणि समृद्ध महाराष्ट्रासाठी महायुती भक्कम होती आहे आणि यापुढेही भक्कमच राहील, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ आज संपत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ आज संपत आहे. त्यामुळे ते आज राज्यपालांची भेट घेऊन राजीनामा देण्याची शक्यता आहे. यानंतर पुढील सरकारचा शपथविधी होईपर्यंत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कारभार पाहतील. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी शिवसेनेने कंबर कसली असल्याचे दिसून येत आहे.दुसरीकडे, देवेंद्र फडणवीस सोमवारी सायंकाळी दिल्लीला गेले होते. त्यांनी अमित शहा यांची भेट घेतली. त्या मुळे आज मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा होऊ शकते. मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित झाल्याचा दावा भाजपशी संबंधित सूत्रांनी केला आहे. दिव्य मराठी नेटवर्कच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १ मुख्यमंत्री आणि २ उपमुख्यमंत्र्यांचा फॉर्म्युला ठरला आहे.



## मोठ्या व्यापाऱ्यांकडून सोयाबीनला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत

लोकनेता न्यूज नेटवर्क
नांदेड । बाजीराव गायकवाड

.सध्या सोयाबीनला बाजारात भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले आहे. सोयाबीनला दिवाळीनंतर तरी भाव मिळेल अशी? अपेक्षा होती. परंतु अद्यापही अपेक्षित भाव मिळत नसल्याने आडत बाजारात आवक घटली आहे.

सोयाबीन पेरणीसह अंतर्गत मशागत कोळपणी, खुरपणी तसेच फवारणी हे सर्व करावे लागते .यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येतो . यावर्षी सोयाबीनला उच्चांकी भाव मिळेल अशी ? अपेक्षा वाटत होती. यामुळे शेतकऱ्यांनी कपाशीकडे दुर्लक्ष करून



सोयाबीनचे क्षेत्र वाढवून मोठ्या प्रमाणात लागवड केली. मात्र सोयाबीनला सध्या बाजारामध्ये ४ हजार दोनशे ते ४ हजार तीनशे भाव मिळत आहे. हा भाव शेतकऱ्याला परवडत नसून शेती तोट्यात आली आहे .सोयाबीनला भाव देण्यात यावा. ही पूर्वी पासूनची मागणी आहे . परंतु आजही पूर्वीप्रमाणेच कमी भाव मिळत असल्याने शेतकरी अडचणीत आले असून शेतीबरोबरच शेतीवर अनेक शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह असल्याने अनेकांना आर्थिक संकटात सामना करावा लागणार आहे. सोयाबीनला भाव मिळत नसल्याने शेतकरी पूर्णतः अडचणीत सापडला आहे.

## अंबिका चौकात ट्रॅफिक जाम कायमस्वरूपी मार्ग काढा अन्यथा आंदोलन करू–सारिका गायकवाड

लोकनेता न्यूज नेटवर्क
बीड । विजय रोडे

बीड शहरात अंबिका चौक हा प्रमुख चौक असल्याने त्या ठिकाणी सातत्याने सकाळी व सायंकाळी ट्रॅफिक जॉब होत आहे. अंबिका चौकात पोलीस प्रशासनाकडून सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसवण्यात आले आहेत. परंतु या ट्रॅफिक जामचा सर्व जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना महिलांना वृद्ध व्यक्तींना व वाढचालकांना त्रास होत आहे. बीड शहरातील गजबजलेल्या चौका पैकी हा अंबिका चौक प्रमुख चौक आहे. तात्काळ ही समस्या सोडविण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या सारिका गायकवाड यांनी ट्रॅफिक जाम मध्ये अडकल्यानंतर प्रत्यक्ष स्पॉटवरून बातमी करून पाठवली आहे. वाहतूक पोलीस शाखेचा एखादा



एखादा कर्मचारी त्या ठिकाणी असणे आवश्यक आहे कारण अंबिका चौकातून पुढे बायपास कडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक मंगल कार्यालय आहेत. बीड शहरात रिंग रोड ह्याच चौकातून पुढे जातो. बीड नगरपालिका व वाहतूक तात्काळ लक्ष घालून यावर उपाय योजना करावी अशी मागणी केली आहे.

## बिलोलीत चोरट्यांचा सुळसुळाट पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष

लोकनेता न्यूज नेटवर्क
बिलोली । गौतम गावंडे

बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही महिन्यांपासून गाड्या चोरी करणार्या चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. शहरातील देशमुख नगर येथील घरा समोर हिरो होंडा स्प्लेंडर प्लस एम.एच २६ ए.बी ६९९८ ही मोटार सायकल २६नोव्हेंबर च्या मध्यरात्री चोरीला केली तर दि.२५ नोव्हेंबर रोजी दुपारी १ ते १:३० च्या सुमारास महाराष्ट्र ग्रामीण बँक येथे पन्नास हजार रुपये भरण्यासाठी गेले होते बॅकते ५० हजार भरण्यासाठी पॅनकार्ड लागेल म्हणाले अस्ता नागोराव भंडारे रा.बामणी हे पॅनकार्ड साठी सेतू कडे पायी चालत अस्तांना अनोळखी अटो व त्या मधील व्यक्तीने ऑटोत बसुन घेतले थोडं समोर उतरवीले खिशात ठेवले रुपये चोरी झाल्याचे लक्षात आले . तिसरी घटना बिलोली ते नरसी राष्ट्रीय महामार्गावर पहाटे युवक जॉगिंग करतांना दुचाकी वरुन दोन व्यक्ती जवळ येऊन १० रुपये आहे का असे विचाले व




हातातील तळौं कंपनीचा मोबाईल चाकु दाखवुन हिस्काऊन घेतले. बिलोली शहर परिसरातुन भागातून गेल्या वर्षभरात अनेक , दुकानातुन लहान मोठ्या चोरीच्या घटना दिसुन येत आहेत तसेच ,मोटारसायकल चोरीला गेल्याच्या घटना घडल्या अनेक गाड्याचा अद्यापही शोध लागलेला नाही.पोलीस ठाण्याच्या हद्दीत गावांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असून बिलोली शहरात गुन्हेगारीला उत येत आहे. मोटार सायकल चोरीचे प्रमाण वाढत आहे . मोटर सायकल सध्या त्यांच्या निशाण्यावर आहेत. या भागांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून मोटर सायकल चोरांचा सुळसुळाट झाला असून रस्त्यावर असो वा इमारतीच्या आवारात समोरील निशाण्यावर असलेली गाडी ते सहजासहजी उडवत आहेत. बिलोली शहरात परिसरात चोरीच्या घटना घडूनही बिलोली पोलीस दुर्लक्ष करीत आहेत. या चोरीच्या घटनामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.शहरात सीसीटीव्ही कॅमेरे नाही, गेल्या वाहनांचा शोध देखील घेतले जात नाही, गेल्या वर्षी चोरी झालेल्या वाहने देखील भेटले नाही. पोलीसांना वाहन चोरटे सापडत नसल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

## अटकळी येथे ग्रा.पं.कार्यालयात भारतीय संविधान दिवस साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क
बिलोली । गौतम गावंडे

बिलोली तालुक्यातील अटकळी ग्रामपंचायत कार्यालयात भारतीय संविधान दिवस साजरा करण्यात आला यावेळी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन संरपच प्रतिनिधी शिवाजी डोंगरे उपसरपंच रणविर डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले आणि भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकाचे वाचन करुन गावातील उपस्थित नागरिकांना संविधान दिवसाचे महत्त्व ग्रामसेवक देवराव हंबिरे सांगितले यावेळी सरपंच प्रतिनिधी शिवाजी डोंगरे उपसरपंच रणविर डोंगरे ग्रामसेवक देवराव हंबिरे सदस्य सुधीर वाघमारे शिवलिंग गायकवाड शोमेश पाटील बोंगाळे युवा सेना रामतीर्थ सर्कल प्रमुख भास्कर भालेराव



वंचित बहुजन आघाडीचे बिलोली तालुका युवा महासचिव अमोल शेरे बालाजी भालेराव नारायण पाचांळ आदी गावातील नागरिक उपस्थित होते.

## दरबार ए शायरी

युक्त्या अन् क्लुप्त्यांनी मित्रा
सर केले तू गौरीशंकर !
पण दसपट त्या, वेगे मित्रा
येणे खाली तुला निरंतर !!
जनमान्यता सोडून जे जे
धरण्या गेले विशाल अंबर !
साक्षीला इतिहास पहावा
पायथ्यावरी आले सत्वर !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे, ॲडव्होकेट, चिखली.

## चारोळी

छंद देई आनंद
हरवून जावे कधीतरी
फिरवत रहावेत कुंचले अन
भावरंग उमटतील अंतरी.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मांडणार श्रीगोंदा तालुक्यातील वास्तविक प्रशासकीय कार्यपद्धतीचा लेखाजोखा

लोकनेता न्यूज नेटवर्क
श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

श्रीगोंदा तालुक्यातील कार्यरत विविध विभागाच्या प्रशासकीय कार्यपद्धतीचे वास्तव व लेखाजोखा श्रीगोंदा तालुका महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून लवकरच जनतेसमोर मांडण्यात येणार असल्याचे माहिती पत्रकार संघाच्या अधिकृत सूत्रांकडून देण्यात आली .
जन हितासाठी आणि जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी शासन विविध योजना आणत असते त्या आधारे करोड रुपयांचा निधी वर्ग करत असते असच तालुक्यात घडत असताना मात्र याबाबत पारदर्शक कारभार कशा पद्धतीने चालतो याबाबतची प्रत्येक विभागानुसार वास्तविक माहिती जनतेला कळावी आणि जनतेचा आणि प्रशासनाचा थेट समन्वय यावा हा





या मागचा मूळ उद्देश असून यामध्ये जे दोषी,दप्तर दिरंगाई किंवा कागदावरच योजना गिळंकृत करणारे अधिकारी यांची पोलखोल सुद्धा केली जाणार आहे दरवर्षी तालुक्याच्या विविध विकासासाठी भरगच्च निधी येऊनही परिस्थिती बदललेली नाही.कुकडी, घोडच्या पाण्यात अनागोंदी , तहसील प्रशासनात दिरंगाई, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डोळ्याला पट्टी, पंचायत समितीमध्ये दिशाहीन कार्यपद्धती ,वनविभागाचा बेजबाबदारपणा,आरोग्य विभागाला कायमच ग्लानी, सब रजिस्टर कार्यालय दलालांच्या विळख्यात,सबब तालुक्यातील सर्वच प्रशासकीय यंत्रणा अनागोंदीच्या फेरीत असल्याचे जनतेच्या माध्यमातून सांगितले जात असल्याने या सर्वच कार्यालयाची माहिती आणि जनतेच्या थेट प्रतिक्रिया घेऊन जशास तशा प्रसारीत केल्या जाणार आहेत.

आपल्या परिसरातील विकास कामे होत असताना दिरंगाई होते का? गुणवत्तेत तडजोड केली जातेय का? ग्रामपंचायत ते तालुका स्तरावर कोणत्या विभागात आडवनुक होते, कोठे अन्याय होतोय याबाबत सविस्तर माहिती संकलित केली जाणार असून ठोस पुराव्यानिशी अधिकारी पदाधिकारी आणि जनता याचा समन्वय साधून प्रशासकीय कार्यपद्धतीचा लेखाजोखा सादर केला जाणार आहे .
याबाबत सुज्ञ नागरिकांनी, युवकांनी,सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ श्रीगोंदा यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन तालुका अध्यक्ष माधव बनसुडे व उप अध्यक्ष ज्ञानेश्वर येवले यांनी केले आहे.

## संपादकीय..

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण 'जोरका धक्का'

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल म्हणजे हरियाणा निकालाची पुनरावृत्ती आहे, असे प्रारंभी म्हणावे लागेल. सर्व मान्यवरांचे, अभ्यासकांचे तर्क–वितर्क हरियाणामध्येही काँग्रेसचे सरकार येण्याचे चित्र मांडत असताना प्रत्यक्षात भाजपाने बाजी मारली. अगदी त्याचप्रमाणे इथेही चित्र फिरले आणि हरियाणाप्रमाणे मोजके राजकीय पक्ष नसूनही विजय खेचून आणण्यात महायुतीला मोठे यश मिळाले. अशा प्रकारचा पराभव अनपेक्षित असणाऱ्या महाविकास आघाडीला हा 'जोर का धक्का' म्हणावे लागेल.

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असणाऱ्या महाराष्ट्रातील निवडणुकांच्या निकालातून कल स्पष्ट झाला असून लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर नव्या दमाने आणि जोमाने पुढे आलेला भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मारलेली मुसंडी हे लक्षवेधी मुद्दे आगामी काळातील राजकारणाचे वारे निर्देशित आणि नियमित करणारे ठरणार आहेत. राज्यातील या निवडणुकीला राजकीय अस्थैर्य, विरोधकांचा तीव्र आणि टोकाचा विरोध, दिवसामाजी बिघडत जाणारे सामाजिक वातावरण याची किनार होतीच, खेरीज बदलापूरचे बालिका अत्याचार प्रकरण, शिवाजीराजांचा पुतळा कोसळणे, मराठा आंदोलनाने वातावरण गढूळ होणे आदी कारणेदेखील होती. खोके सरकार, गद्दार, आमदार अपात्रतेच्या मुद्द्यांचा कोलाहलही पाठीमागे होताच. तशातच लोकसभा निवडणुकीमध्ये देशात जेमतेम तारल्या गेलेल्या भाजपाला राज्यातील जनतेने नाकारल्याचे चित्रही तणाव वाढवणारे होते. मात्र अशा तणावग्रस्त अवस्थेतही महायुतीने संयमाने आणि नेटक्या नियोजनानिशी परिस्थिती सावरली आणि नेत्यांपासून सर्वसामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनीच प्रयत्नपूर्वक जनमताचा कौल आपल्याकडे वळवण्यात यश संपादीत केले.थोडक्यात, हा जनतेने घेतलेला एक निर्णय असला तरी त्याचे अनेक अन्वयार्थ निघतात. या काळात संपूर्ण देशाने योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'एक हैं तो सेफ है'चा नारा ऐकला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये तो लक्षवेधी ठरलेला दिसत आहे. त्यामुळेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे कल भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीचे वादळ दर्शवत असणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांमध्ये भाजपाच्या महायुती आघाडीला २०० हून अधिक जागा मिळणे जनतेचा बदलता कल स्पष्ट करणारे आहे. दुसरीकडे, उत्तर प्रदेशमध्ये नऊ विधानसभा जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाला किमान सात जागा मिळताना दिसत आहेत. या विजयाचे प्रमुख कारण ध्रुवीकरण असल्याचे मानले जात आहे. अर्थातच याचे विश्लेषण होत राहणार आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विजयानंतर भाजपा सावध झाला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला ४८ पैकी ३१ तर महायुतीला १७ जागा मिळाल्या. यानंतर भाजपा आणि संघाने आपली रणनीती बदलली. अत्यंत सावधगिरीने योगी आणि मोदींनी बाजी मारली. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीचे आकडे बघितले, तर भाजपाला १०५ जागा मिळाल्या होत्या. दुसरीकडे, शिवसेनेला (अविभाजित शिवसेना) ५६ जागा, राष्ट्रवादीला (अविभाजित राष्ट्रवादी) ५४ जागा आणि काँग्रेसला ४४ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मिळून सरकार स्थापन केले. मात्र, ही आघाडी जास्त काळ सरकार चालवू शकली नाही. जून २०२२ मध्ये शिवसेनेतील अंतर्गत वादामुळे एकनाथ शिंदे वेगळे झाले. अजित पवारांनी राष्ट्रवादीतील एक गट सोबत आणला. यानंतर ते एकनाथ शिंदे यांच्या भाजपा आणि शिवसेना सरकारमध्ये सामील झाले आणि उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादीच्या मतदारांना महायुतीकडे वळवण्यात या घटकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच वेळी शिवसेनेच्या मतदारांना महायुतीशी जोडण्यातही शिंदे यांना यश आले. ताज्या निकालाने महाराष्ट्रातील मराठा फॅक्टर आणि बेरोजगारीचा मुद्दा महाविकास आघाडीच्या फायद्याचा राहिला नसल्याचे स्पष्ट केले आहे. किंबहुना, मतांच्या ध्रुवीकरणामुळे हे मुद्दे मागे पडले, असेही आपण म्हणू शकतो. त्याच वेळी देशभरात बळकट झालेल्या हिंदुत्वासारखा मुद्दा महायुतीने समोर आणला. महायुतीला अपेक्षेप्रमाणे योगी आणि मोदींच्या घोषणांची मोठी मदत मिळाली.हरियाणामध्ये योगी आदित्यनाथ यांनी ही घोषणाबाजी केली आणि तिथे भाजपाचा विजय झाला. मात्र, भाजपाने योगींचे 'बटेंगे ते कटेंगे'असे बॅनर महाराष्ट्रात लावले तेव्हा तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, कारण उत्तर प्रदेश किंवा हरियाणाप्रमाणे महाराष्ट्रामध्ये हिंदुत्व प्रचलित नाही. पण, निकाल समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही ध्रुवीकरणाचे पर्व सुरू झाल्याचे जाणवले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने 'संविधान बचाओ'चा नारा दिला होता. ही घोषणा विशेषत: उत्तर प्रदेशमधील लोकसभा मतदारसंघांमध्ये कामी आली. मात्र महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत या घोषणेचा शून्य परिणाम बघायला मिळाला. खेरीज मराठा आरक्षणावरही काँग्रेस बाजी मारू न शकल्याचे चित्र दिसत आहे. सर्वात महत्त्वाचा आणि लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे महाराष्ट्र निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मोलाची मदत झाली आहे. हरियाणाप्रमाणे येथेही आरएसएसचे लोक भाजपाच्या प्रचारासाठी सक्रिय होते. किंबहुना, लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपाच्या खराब कामगिरीचे कारण जनसंपर्क कमी पडणे, सर्वसामान्यांपर्यंत कार्यकर्ते न पोहोचणे हे मानले जात होते. मात्र ही चूक सुधारत महाराष्ट्रात संघ कार्यकर्ते प्रचारात उतरले. संघाच्या स्वयंसेवकांनी भाजपाच्या मागे आपली शंभर टक्के ताकद लावली होती. भाजपालाच मत द्या, असा त्यांचा थेट प्रचार नसला तरी अप्रत्यक्षपणे त्यांनी आपल्याच विचाराच्या भाजपाला मोठे बळ देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच यंदा गल्लोगल्ली, प्रत्येक वॉर्डामध्ये संघाची ताकद दिसली. त्यामुळेच भाजपाचे पारडे यशाकडे मोठ्या प्रमाणात झुकले.लोकसभा निवडणुकीमध्ये मुस्लीमांची एकगठ्ठा मते उद्धव ठाकरेंच्या पारड्यात पडली. मात्र आताच्या निवडणुकीत त्याच्या परिणामांची जाण करून देण्यात महायुती यशस्वी ठरली. लोकसभा निवडणुकीनंतर बांगलादेशमध्ये घडलेल्या घटना जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहिल्या. जणू त्याला प्रतिक्रिया म्हणूनच सिमल्यातील एक अवैध मशिद पाडण्यासाठी तिथला समस्त हिंदू समाज एकवटलेला दिसला. म्हणजेच जातीपातीच्या, प्रांत, भाषेच्या नावाने आपण वेगवेगळे राहिलो तर आपल्यावर अतिक्रमण होईल, हे मत जनतेला पटलेले दिसले. एक राहिलो तर आपल्याकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही, कोणी हल्ला करणार नाही हा विचार स्वीकारल्याचेही जनतेने ताज्या निकालाद्वारे सूचित केले आहे. एकीचा हाच मुद्दा महाराष्ट्रात, विशेषत: ग्रामीण भागात वारकरी सांप्रदायानेही उचलून धरला. त्यांनी छोट्या छोट्या गटसभा घेऊन, अगदी ५०–१०० लोकांच्या सभा घेत हा विचार पोहोचवण्याचे मोलाचे काम केले. एखाद्या देवळात, आवारात पार पडलेल्या अशा छोट्या सभांची संख्या ६० ते ७० हजारांच्या घरात होती. त्याचाही परिणाम ताज्या निकालावर प्रभावीपणे दिसून येत आहे.या सगळ्याबरोबरच जनतेच्या डोळ्यांसमोर महायुतीचे काम होतेच. मध्य प्रदेशातील भाजपा सरकारच्या 'लाडली बहन योजने'नंतर महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरू केली आणि वेगाने रेटली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. भाजपाच्या दणदणीत विजयात या घटकाचाही मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. विरोधकांनी या योजनेला मोठा विरोध केला. काही दिवसांमध्येच महिलांना पैसे मिळणे बंद होईल, सरकारची ही महत्त्वाकांक्षी योजना बंद होईल असे म्हणत एकीकडे त्यांनी अपप्रचार केला, तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील मोठ्या राजकीय पक्षांनी आपल्या प्रचारा दरम्यान जाहीर केलेल्या जाहीरनाम्यामध्ये आपले सरकार सत्तेत आल्यास महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा करण्याच्या घोषणा केल्या. ही बाबही चाणाक्ष नागरिकांच्या नजरेतून सुटली नाही. खेरीज महाविकास आघाडीचा भाग असलेली काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महागाई, बेरोजगारी या मुद्द्यांवर केलेला राज्य सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्नही तोकडा पडला. त्यांना जनतेचा पाठिंबा मिळेल, अशी आशा होती. पण, परिणाम उलटे झाले. महाराष्ट्रात सोयाबीनच्या हमीभावाचा मुद्दाही उपस्थित झाला नाही. राहून गेलेल्या अशा अनेक मुद्द्यांवर पुढील काळात चर्चा होत राहीलच. सविस्तर अवलोकनही होईल. मात्र तूर्तास तरी महायुती भरभक्कम आघाडी मिळाल्याचा आनंदोत्सव साजरा करत आहे. त्यांना शुभेच्छा देत पुढील पाच वर्षांमध्ये सुशासनाची अपेक्षा व्यक्त करू या.

# महाराष्ट्रातील निवडणुकीचे साद पडसाद

निवडणुका झाल्या . निकाल लागले. निकाल धक्कादायक आहेतच. पण जो तळातील कार्यकर्ता होता त्याला कदाचित हा निकाल इतका धक्कादायक वाटत नसावा. मराठी माध्यमांनी महाराष्ट्राचे रणनितीकार म्हणून नेहीप्रमाणेच ज्या नेत्याला चाणक्य , जाणता राजा वगैरे पदव्या बहाल केल्या तो शेवटच्या क्षणी काही विकृत कारस्थाने करून पुन्हा गेल्यावेळ सारखे राज्य आणेल म्हणून त्याला ती संधीच न ठेवता जनतेने त्याच्या विकृत कारस्थान प्रणालीला पूर्ण पणे बाहेर फेकून दिले आहे. ज्याने हिंदुत्व आपल्या खुर्चीसाठी विकून अनेक भोळ्या भाबड्या कार्यकर्त्यांना , अनुयायांना निराशेच्या अंधारात लोटले , ज्याच्या बद्दल चाय बिस्कीट माध्यमांनी सहानुभुतीचे वातावरण निर्माण केले अशा नकली ,ढोंगी, अहंकारी माणसाला, त्याच्या राक्षसी महत्वाकांक्षाना कायमचा प्रतिबंध घालून जनतेने त्याला घरी बसवले. संविधान आणि आरक्षण आणि जातीनिहाय गणना ह्या मुद्द्यांना घेवून हिंदूंच्या मधील जात व्यवस्थेचे संघर्षात रूपांतरित करण्याचा प्रयत्न करणारा सॉरासचा एजंट आणि त्याचे चार चमचे ( संगमनेर , कऱ्हाड , लातूर आणि साकोल) जे आपल्या आपल्या ठिकाणी सरंजामदार होते ह्या सगळ्यांना हिंदू समाजाने एकमुखाने नाकारत कायमचे घरी बसवले आहे. महाराष्ट्राचे उद्योग गुजराथने पळवले , गुजराथचे महाराष्ट्रावर आक्रमण हे भंपक विमर्श पसरवणाऱ्या भोंग्याला आणि त्याचे प्रसारण करणाऱ्या माध्यमांना समाजाने जागा दाखवून दिली आहे. मोदी , शहा, योगी यांचा मर्यादा सोडून अपमान आणि अडाणी, अंबानी यांचे भजन आणि त्यातून विकासाला विरोध हे आता लोकांना सहन होण्याच्या पलीकडे आहे. महिलांच्या प्रती दुय्यम भाव , त्यातून लाडकी बहीण योजनेला विरोध याचा महिलांच्यावर होणारा परिणाम हे लक्षात न घेता नाना गँग उद्धट पणे बोलत राहिली. अहिल्या नगर झाले आणि त्यांनी अहिल्यादेवी यांच्याशी जणू वैर धरले. लोकांना हे कळत होते. महिला प्रक्षुब्ध होत्या. लव्ह जिहाद कडे काना डोळा करणारे सरकार महिलांना नको होते. छत्रपतींचा बारा बलुतेदार आणि अठरा पगड जातींच्या महाराष्ट्र धर्म वाढवण्यासाठी समाज मतदानाला सज्ज झाला होता. एक महाराष्ट्र श्रेष्ठ महाराष्ट्र हा संतांचा संदेश समाजाला भावला होता. त्यामुळे आपल्या मतांच्या शक्तीची जाणीव त्याला झाली होती. हनुमंताला जांबुवंत आठवण करायला होते , अर्जुनाला युद्धासाठी भगवान श्रीकृष्ण सिद्ध करण्यास होते. येथे समाजरुपी हनुमंत आणि अर्जुन याना असंख्य जांबुवंत आणि श्रीकृष्णांनी जागे केले , सिद्ध केले आणि त्यामुळे ह्या रामायण , महाभारतात रावण , कुंभकर्ण , शुर्पणखा, दुर्योधन ,दुःशासन भस्म झाले. हा निकाल कुणा एका पक्ष , संघटना , नेता यांचा विजय आहे असे मानण्याची आवश्यकता नाही. हा विजय समाजाने साकारलेला विजय आहे. हा समाजाचा विजय रामगिरी महाराज याना धमकी देणाऱ्यांना थप्पड मारणारा आहे . हा समाजाचा विजय मुस्लिम समाजाबरोबर निर्लज्ज पणे गुडघे टेकवून हिंदूंच्या जमिनी , मंदिरे आणि माता भगिनी यांचे भविष्य पणाला लावणाऱ्या लोकांना कानशिलात मारणारा आहे. छत्रपती शिवरायांचा , संभाजीराजे यांचा इतिहास विकृत करून त्यावर आपल्या मतांचा सौदा करण्यासाठी बी ग्रेड आणि तत्सम संघटना यांच्या माध्यमातून डाव रचणाऱ्या मंडळींना समाजाने त्यांची जागा दाखवली आहे. हिंदूंचे श्रद्धास्थान मग स्वामी समर्थ असो प्रभू रामचंद्र असो किंवा गणपती असो त्याची चेष्टा करणारे कायमचे घरी बसवण्याचे काम या निमित्ताने झाले आहे हिंदू समाजाने केवळ एव्हढे एक काम केले की हिंदू म्हणून मतदान करायचे ठरवले , तर ह्या राष्ट्रविरोधी शक्तींचा पालापाचोळा झाला. जर पुढील काळात उर्वरित ३५ टक्के हिंदूंनी मतदानाचे कर्तव्य पार पाडायचे ठरवले तर हिंदूंच्या विरुद्ध वाकड्या नजरेने पाहण्याची कुणाची हिम्मत होणार नाही. पुढील काळात त्यासाठी सजग राहण्याची ही खरी सुरुवात झाली आहे. आचार्य स्वामीजी गोविंददेव गिरी , रामगिरी महाराज यांच्या पासून सर्व संत महंत ह्या वेळी कुठलाही आड पडदा न ठेवता बाहेर पडून मतदान करण्याचे आवाहन करत होते. अनेक विचारवंत, पत्रकार , लेखक पत्रकार पायाला फिरकी लावून महाराष्ट्र पिंजून काढत होते. उदय निरगुडकर , सुरेश चव्हाणके हे त्यात अग्रेसर होते. नरेंद्र पाटील मराठा समाजाला समजावून सांगण्यासाठी अहोरात्र फिरत होते. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज शिरीष महाराज मोरे यांच्या कष्टाला तर तोड नाही. राहुल सोलापूरकर सारखे अभिनेते आणि अविनाश धर्माधिकारी सारखे माजी सनदी अधिकारी यात मागे नव्हते. एकीकडे संविधान , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घ्यायचे पण सातत्याने त्यांचा अपमान करायचा. काँग्रेसचा हा बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भातील काळा इतिहासच ह्या निमित्ताने पुढे आला. क्षितिज गायकवाड सारखे दलित तरुण नेते हिरीहिरीने पुढे आले त्यांनी मांडलेला विषय दलित बंधूंना समजत गेला हे आणखी एक ह्या निवडणुकीचे सकारात्मक वैशिष्ट्य. ह्या सगळ्या घडामोडीत समाजाने निवडणूक हातात घेतली. समोरून कट , कारस्थाने , अन्याय ह्याचा कळस गाठल्यावर समाजाने पक्का निर्धार केला. जाती मध्ये विभागण्यावर, 'एक है तो सेफ है' किंवा 'बटोंगे तो कटोंगे' ह्या घोषणा आणि त्या मागील आशय समाजाने लक्षात घेतला आणि तेथेच निवडणूक निकाल नक्की झाला .मतदानाची वाढलेली टक्केवारी सांगत होती निकाल काय लागणार ! औरंगजेब, अहमद शहा यांचे उदात्तीकरण करताना अहिल्या देवी , संभाजी राजे याना नाकारणे , पांडुरंगाच्या वारी मध्ये घुसून त्याला अपवित्र करणे आणि एकात्म वारकरी समाजात छेद निर्माण करणे ह्या गोष्टी हिंदू समाजाला बिलकुल आवडलेल्या नाहीत. पुढील काळात हिंदू समाजाला कुणी गृहीत धरून चालणार नाही हे येथे स्पष्ट झाले आहे. महायुतीतील सर्वच पक्षाच्या उमेदवारांना , समाजाने हिंदुत्वाचा राजकीय आशय स्वीकारल्यामुळे विजय प्राप्त झाला आहे हे समजून घेण्याची गरज आहे. निखिल वागळे , विश्वंभर , सरोदे सहित उल्का आणि तथाकथित पुरोगामी काजवे याना आता अंधारात नाही तर हिंदुत्वाच्या स्वच्छ आणि दैदिप्यमान प्रकाशात आपले अस्तित्व शोधावे लागणार आहे. महाराष्ट्राने खऱ्या अर्थाने आता कात टाकली आहे. समाजाने समाजासाठी लढवलेली ही निवडणूक होती. व्होट जिहाद , वक्फ बोर्ड आणि लव्ह जिहाद याने क्षुब्ध झालेल्या हिंदू मनाला ही निवडणूक व्यक्त होण्याची संधी होती . ती ह्या समाजाने चोख पणे साधली . त्यामुळे हा विजय समाजाला समर्पित करू या आणि सजग राहण्याचे हे आंदोलन दीर्घकाळ पुढे नेण्यासाठी सज्ज होवू या .

**–रवींद्र मुळे,अहिल्या नगर**

# लाडक्या महायुतीचा खटाखट विजय

अवघ्या भारतवर्षाचे लक्ष लागलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीचे निकाल हाती आले असून भाजपा महायुतीच्या वादळात इंडी आघाडी जमीनदोस्त झाली आहे. हरियाणा पाठोपाठ महाराष्ट्रातील जनतेने जातीपातीच्या भिंती तोडत जातीयवादी विरोधकांना आडवे केले आहे. दोन्ही राज्यांमध्ये जातीपातीच्या समुहाद्वारे राज्य, केंद्र सरकारला वेठीस धरण्याचा दुष्ट प्रयत्न जनतेने हाणून पाडला आहे. भाडोत्री आंदोलन जीवी असोत की अंधश्रद्धेचे मानवी बॉम्ब असोत अथवा काकस्पर्श झालेले पोपट असोत, सुज्ञ जनतेने विवेकबुद्धीला स्मरत महायुतीच्या पारड्यात भरभरून मतदान केले आहे.

खरेतर लोकसभा निवडणूकांनी समस्त राजकीय पक्षांना डोळस निकाल दिला होता. यांत एनडीए ची पिछेहाट झाली होती तर म्रुतप्राय इंडी आघाडीला जीवदान मिळाले होते. भाजपने चारसौ पार च्या धक्क्यातून सावरत सरकार स्थापन केले तर इंडी आघाडीचा वारू अल्प यशाने बेभान झाला होता. ५४३ पैकी ९९ जागा जिंकलेला कॅांग्रेस पक्ष ९९ टक्के यश मिळाल्यासारखा उडत होता. तर एकंदरीत इंडी आघाडी उन्मत्त, उद्दाम होत गेली, जणुकाही स्वर्ग त्यांना दोन बोटे उरला होता. इंडी आघाडीने लोकसभेला जे फेक नॅरेटीव्ह सेट केले, जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करून जे थोडेफार यश मिळवले ते त्यांना पचले नाही. जनतेला इंडी आघाडीला मदत केल्याचा पश्चाताप झाला होता आणि त्याचा हिशोब जनतेने विधानसभेत चुकता केला आहे.

राहिली बाब महाराष्ट्राची तर तीन नापासांनी मिळून भाजप नावाच्या मेरीट विद्यार्थ्यांला गंडवले होते. मात्र अमर अकबर अँथनी उर्फ जॅान जानी जनार्दनच्या मविआने सत्ता मिळताच आपले खरे रूप दाखवून राज्यात बेबंदशाही माजवली. मग ते पालघर, करमुसे, कंगणा, नारायण राणे, अर्नव प्रकरण असो अथवा कोवीड महामारीतील घोटाळे असोत. एवढेच नव्हे तर नॅशनल हायवे असो अथवा विकास प्रकल्प असोत, मविआ सरकार स्थगिती सरकार म्हणून कुप्रसिद्ध झाले होते. अरेरावी, दडपशाही आणि भोंगळ कारभाराने राज्याचे तीनतेरा वाजले होते. अखेर एकनाथ शिंदेंनी वेगळी चूल मांडून भाजपशी हातमिळवणी करत मविआची अराजकता संपुष्टात आणली.

लोकसभेत झालेल्या चुकांतून धडा घेत महायुतीने विधानसभेत एकदिलाने लढण्याचा चंग बांधला होता. तसेही भाजपा शिंदेसेनेचे नाते बांहो में तेरे मस्ती के घेरे सारखे होते तर अजितदादांच्या एंट्री ने युती बदनाम हुई डार्लिंग तेरे लिए असे होण्याची भीती होती. मात्र काळवेळेचे भान ठेवत तिन्ही पक्षांनी इंडीला गाडून विधानसभा सर करण्याचा संकल्प केला होता. अर्थातच अजितदादा आणि चक्की पिसिंगचा वादग्रस्त मुद्दा असला तरी त्यांनी आजन्म दुसर्यांचे घर फोडणार्यांना जी जन्माची अद्दल घडवली, त्यामुळे ते महायुतीत हवेहवेसे वाटत होते. पण विधानसभा एवढी सोपी अजिबात नव्हती. २०२४ पर्यंत महाराष्ट्रात शाफुआ नावाचा परवलीचा शब्द होता, त्याची जागा २०२४ ला आसंजा (आरक्षण, संविधान, जातनिहाय गणना) या शब्दाने घेतली होती आणि पुन्हा एकदा महायुतीला या संभ्रम, दुष्प्रचाराचा भोपळा फोडणे गरजेचे होते, जे त्यांनी सहजपणे केले.जिथे महायुतीत सगळं ऑल इज वेल होतं, तिथे इंडी आघाडीत मुख्यमंत्री पदावरून मोगलाई, बेदिली माजली होती. इंडी आघाडीत या मुद्द्यावर खाटा कुरकुरायला लागल्या होत्या आणि हम भी डुबेंगे सनम तुम को भी ले डुबेंगे सारखी परिस्थिती उद्भवली होती. इंडीच्या दिमतीला निर्भय बानो, काकस्पर्शी मिडिया, चाय बिस्किट पत्रकारांची फौज होती. यामुळेच महायुतीला काहीतरी गेमचेंजर प्लॅन हवा होता, जो त्यांनी लाडकी बहीण योजनेद्वारे अंमलात आणला. प्रारंभी इंडी आघाडीने या योजनेची येथेच्छ टिंगल टवाळी केली. लाडक्या बहिणींचा भरघोस प्रतिसाद पाहता इंडीने भ्रामक खटाखट योजना प्रस्तुत केली. मात्र लाडक्या बहिणींना लबाडाचं आवतन जेवल्या शिवाय खरं नाही हे चांगलंच ठावूक होतं.

विधानसभेचे रणमैदान सज्ज झाले होते, दोन्ही बाजूंनी दंडबैठका सुरु होत्या. पण निर्णायक वार करण्यासाठी महायुतीने अमोघ शस्त्राचा वापर करणे ठरवले होते आणि त्यासाठी निवड केली होती, आदित्यनाथ योगी यांची. लोकसभेला इंडीला झालेल्या एकगठ्ठा मतदानाचा तोड योगी यांनी हळुवारपणे काढला. त्यांचा बटेंगे तो कटेंगे या नार्याने हिंदूंच्या मनातील खदखद बाहेर पडली. योगींनी जळजळीत वास्तव मांडताच हिंदूंना आपल्या मतांची किंमत कळली. अभी नहीं तो कभी नहीं हे जाणत हिंदू मतदानासाठी पेटून उठला. भरीस भर म्हणून मोदींच्या एक है तो सेफ है घोषणेने हिंदू मन आश्वस्त झाले. लोकसभेची उतराई म्हणून यावेळी त्यांनी महायुतीला सुगीचे दिवस आणून दिले.२३ नोव्हेंबर २०२४ हा दिवस महायुती साठी सोनियाचा दिनू ठरला. भाजपने दिडशेच्या दिशेने झेप घेतली तर शिंदेसेना, अजितदादांनी पन्नाशीला गवसणी घातली. इंडी त्रिकूटाला पन्नाशीत गारद करत जनतेने हिंदुत्वाच्या बावन्नकशी सोन्यावर शिक्कामोर्तब केले. आमचे हिंदुत्व शेंडी जानव्याचे नाही, साल्यांनो मी तुमच्या देवांचा बाप आहे, तसेच वक्फ बोर्ड प्रकरण आणि १७ मागण्या संदर्भात ममत्व दाखवत इंडीने हिंदुत्वाचा दु:स्वास केला, हिंदूंना डिवचले, खिजवले, खजील केले. यामुळेच हिंदूंनी खुन्नसपणे मतदान करत इंडीला सुप्रुदे खाक केले. हिंदू देवीदेवतांचा अपमान करणाऱ्यांना उपरवाले की लाठी की आवाज नहीं होती, सिर्फ अहसास होता है याची जाणीव झाली असावी.

या रणधुमाळीत देवेंद्र फडणवीस मॅन ऑफ द मॅच ठरले. विरोधकांकडून सातत्याने होणारी टीका, जात आणि कुटुंबावर होणारे शिव्याशाप आरोप यांना एकटे देवेंद्रजी पुरून उरले. अकेला देवेंद्र काय करू शकतो याचे चोख प्रत्युत्तर दिले. मुंबई तोडण्याचा डाव असो की उद्योगधंदे गुजरातला नेण्याचा कांगावा, संविधान बदलने असो की आरक्षण प्रश्न असो देवेंद्रजींनी विरोधकांना चांगलाच धडा शिकवला आहे. थोडक्यात काय तर केंद्र राज्य सरकारच्या विकासामुख योजना, लाडकी बहीण योजना, मतदानाची वाढलेली टक्केवारी, राज्यात एकाच दिवशी मतदान घेणे, इंडीचे फेक नॅरेटीव्ह मोडून काढणे, हिंदुत्वाची पाठराखण करणे याशिवाय बटेंगे तो कटेंगे आणि एक है तो सेफ है या घोषणांनी राज्यात महायुतीची त्सुनामी आली, महाराष्ट्रात जनतेच्या मनातील सरकार आले. २०१९ च्या दगाबाजीचा हिशोब जनतेने २०२४ ला व्याजासहीत पुर्ण केला. १०५ घरी बसवणार्यांच्या उरावर २३० बसवून देवेंद्रजींनी इंडी आघाडीला यहां के 'हम है सिकंदर' हे दाखवून दिले आहे.

**–डॉ.अनिल पावशेकर,मो. ९८२२९३९२८७**

# प्लास्टिकच्या डोंगराला चाप?

जगभरातच प्लास्टिकचा विळखा वाढत आहे. प्लास्टिकचे अतिसूक्ष्म कण विविध परिसंस्थांची भीषण हानी करत आहेत, तसेच उत्सर्जनाच्या माध्यमातून हवामान बदलालाही गती देत आहेत. सन २०५०पर्यंत प्लास्टिकचा कचरा आजच्या दुप्पट होईल, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. असे असले, तरी प्लास्टिकचा पुनर्वापर आणि कचरा व्यवस्थापनात अधिक गुंतवणूक यांसारख्या धोरणांच्या आधारे यातील ९० टक्के कचऱ्याला आळा घालणे शक्य आहे, असा दिलासादायी निष्कर्ष एका अभ्यासातून मांडला गेला आहे. त्यामुळे यातून होणाऱ्या उत्सर्जनाला एक तृतीयांशपर्यंत आळा घालणे शक्य होणार आहे.



'सायन्स' या विज्ञानपत्रिकेत हा अभ्यास अहवाल प्रसिद्ध झाला आहे. प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्याच्या उद्देशाने या आठवड्यात कोरियातील बुसान येथे होत असलेल्या संयुक्त राष्ट्रे प्लास्टिक कराराच्या पार्श्वभूमीवर ही माहिती पुढे आली आहे. याआधी यासंदर्भातील परिषद कॅनडामधील ओटावा येथे एप्रिल महिन्यात झाली होती. त्यानंतर आता कोरियात १९० देशांमधील प्रतिनिधी एकत्र जमून या कराराला अंतिम स्वरूप देणार आहेत.

प्लास्टिकच्या कचऱ्याबाबत सध्याचे कल कायम राहिले, माणसाची वर्तणूक कामय राहिली तर सन २०५०पर्यंत प्लास्टिकचा कचरा दुप्पट होऊन १२१ मेट्रिक टनांवर जाईल . त्याचसोबत, प्लास्टिकमुळे होणारे हरितगृह वायूंचे उत्सर्जन २०२०च्या पातळीवरून ३७ टक्क्यांनी वाढून ३.३५ गिगाटोनपर्यंत जाऊ शकते, असे शास्त्रज्ञांनी म्हटले आहे. प्लास्टिक कचऱ्याच्या गैरव्यवस्थापनाला लगाम घालण्यासाठी धोरण ठरवणे महत्त्वाचे आहे.त्यासाठी नवीन प्लास्टिक उत्पादनांसाठी ४० टक्के प्रक्रियाकृत प्लास्टिकचा वापर करावा, नवीन प्लास्टिकच्या निर्मितीला २०२०मध्ये घातलेल्या मर्यादा घालाव्यात, प्लास्टिक कचरा व्यवस्थापनामध्ये लक्षणीय गुंतवणूक करावी आणि प्लास्टिकच्या पॅकेजिंगवर शुल्क आकारण्यात यावे ही चार सूत्रे यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील, असे शास्त्रज्ञांनी या अभ्यासात नमूद केले आहे. प्लास्टिकच्या व्यवस्थापनामध्ये डम्पिंग ग्राउंड व्यवस्थापन आणि कचरा संकलन केंद्रांचाही समावेश आहे. या पार्श्वभूमीवर, प्लास्टिकच्या भस्मासूराला रोखण्यासाठी विविध पातळ्यांवर गांभीर्याने पावले उचलणे आवश्यक आहे, याकडे तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे.

# युवा पिढीने संविधानाचा सखोल अभ्यास करावा-आ.सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**





सध्याची युवा पिढी ही सोशल मीडियावर जास्त ऍक्टिव्ह असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.मोबाईल मुळे वाचन क्षमता हरपत चाललेली आहे. घराघरांमध्ये मोबाईलने थैमान घातल्यामुळे वाचनाकडे आई-वडिलांसह मुलाचेही दुर्लक्ष होत चालले आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल्या संविधानात आहे हे वाचण्यासाठी आजची तरुणाई वेळ देत नाही.त्यासाठी तरुणांनी संविधानाचा सखोल अभ्यास करण्याचे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले. ते आष्टी येथे नगरपंचायत कार्यालयात संविधान दिन कार्यक्रमात बोलत होते यावेळी व्यासपीठावर मुख्याधिकारी सौ.पाटील मॅडम,नगराध्यक्ष जिया बेग,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना धस म्हणाले की,भारताचे संविधान जगाच्या पाठीवर सर्वश्रेष्ठ मानले जाते. येथील बंधूता,समता आणि स्वातंत्र्य जगाच्या पाठीवर कुठेही पहायला मिळत नाही भारतीय संविधानाने येथील नागरिकांना खरे स्वातंत्र्य बहाल करून दैनंदिन जीवन जगण्याचा अधिकार दिला आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर डॉ राजेंद्र प्रसाद आणि सर्व सदस्यांनी दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी घेऊन सक्षम राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार करून २६ जानेवारी १९४९ ला देशात ती अमलात आली.जगाच्या पाठीवर सक्षम लोकशाहीचा आपण स्विकार केला.दैनंदिन जीवनात कसे जगायचे हे अधिकार आपल्याला राज्यघटनेने दिलेले आहेत अनेक महापुरुषांनी अभ्यास करून तळागाळापर्यंत जाऊन सक्षम राज्यघटना निर्माण केली आहे. तळागाळातील लोकांना जगण्याचा अधिकार हा संविधानाने दिला असून यामुळे अनेक गोरगरीब व दिन दुबळ्या जनतेचा मोठा फायदा झाल्याचे धस यांनी सांगितले. यावेळी आष्टी शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले.उपनगराध्यक्ष व्यापारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय शेठ मेहेर अरुण भैय्या सरपंच अशोक मुळे,डॉ जालिदर वांढरे,सचिन लोखंडे, निकाळजे,सादीक कुरेशी,बाळुशेठ मेहेर दीपक निकाळजे,राजेंद्र जोशी, राहुल मुथा,नवनीत कासवा,बंबुशेठ आतार शममुभाई दारुवाले,समिर शेख,शरीफ शेख,मधुकर नवसुपे,पत्रकार उत्तम बोडखे,दत्ता काकडे,रघुनाथ कर्डीले, दुर्गेश कुलकर्णी, जोतिबा रेडेकर,अविशांत कुमकर,शरद रेडेकर,प्रविण पोकळे,शरद तळेकर,सचिन रानडे,गणेश दळवी,संतोष सानप,आधीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात संविधान दिन साजरा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे आज मंगळवार दिनांक २६ नोव्हें. २०२४ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला आला.

संविधान दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना संविधानाचे अंतरंग या पुस्तकाचे वाटप करून संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात. या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. एस. एन. व्यास सर, कार्यक्रमाचे संयोजक श्री. ए.एस.दंदाले सर आदी उपस्थित होते.श्री.व्ही.यू.दाभाडे सर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत असताना संविधान निर्मितीची प्रक्रिया,पार्श्वभुमी इत्यादी बाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांना संविधानाचे अंतरंग समजावून सांगितले. या संपुर्ण कार्यक्रमाचे संयोजन श्री.ए.एस.दंदाले सर यांनी केले तर श्री राठोड सर यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांबरोबरच विद्यालयातील सर्व शिक्षक - शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होत्या.

# रोजगार सेवकास केले कमी;मात्र पंचायत समितीत काम सुरूच

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**




हिंगोली:-जिल्ह्याच्या सेनगाव तालुक्यातील हत्ता नाईक येथील ग्रामपंचायतचे ग्रामसेवक श्री, टी ,एस साठे यांनी दिनांक ३०/ ९/ २०२४ रोजी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री, भोजे यांना एका पत्राद्वारे हत्ता नाईक येथील रोजगार सेवक गजानन भुजंगराव हिंमगीरे यांना रोजगार सेवक या पदावरून कमी करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली असून आपल्या इकडे असलेली एमआर जी एस ची संचिका, मोजमाप पुस्तका व इतर असलेले कागदपत्रे ग्रामपंचायत हत्ता नाईक या कार्यालयामध्ये सादर करण्याचे आदेश या पत्राद्वारे देण्यात आले व तसेच याची सर्वस्व जबाबदारी रोजगार सेवक गजानन हिंगे यांच्यावर राहील या स्वरूपाचे पत्र गटविकास अधिकारी व गजानन भुजंगराव हिंमगीरे यांना देण्यात आले असून दिनांक ३० -९ -२०२४ रोजी दिली आहे मात्र अद्यापही हत्ता नाईक या ठिकाणी चे रोजगार सेवक घेण्यात आलेले नाही त्यामुळे अनेकांची कामे रखडली आहेत तरी सदरील रोजगार सेवक हा रोजगार सेवक आहे असे जताऊन नागरिकांना सांगून कामे करताना पहावयास मिळत आहे यांना कोणाचा पाठिंबा असेल पदभार कमी करू नही कोणाच्या जोरावर हा रोजगार सेवक काम करत असेलअसे अनेक प्रश्न चौकात व हत्ता फाटच्यावर हत्ता नाईक गाव ,तांडा,वाडी, तांडा तील नागरिकांचा चर्चेचा विषय बनला आहे तर गट विकास अधिकारी हे नवीन रोजगार सेवक रुजू करण्याचे पत्र का काढत नाहीत असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे,

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय न.प.कंधार येथे संविधान दिन साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार येथील पालिका प्रशासक तथा तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्या आदेशाने नगरपरिषदचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.यावेळी सर्वप्रथम मोहम्मद रफीक सत्तार सह ग्रंथपाल व वाचनालयाचे अविरत वाचक बुरफुले हरी,उद्धवराव,शेख फारुख भाई,यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमेसहीत असलेल्या संविधान फलकास पुष्पहार अर्पण केले. तसेच उपस्थित वाचकांनीही पुष्प अर्पण केले. यानंतर मोहम्मद रफीक सत्तार सह ग्रंथपाल यांनी संविधान दिवसाबद्दल उपस्थित वाचकांना माहिती दिली. त्यानंतर उपस्थित वाचक व कर्मचारी यांनी सामूहिक रित्या संविधान प्रस्ताविकीचे वाचन करण्यात आले. यावेळी कर्मचारी दत्ता ऐनवाड, मिलिंद महाराज, कमलबाई जाधव, वंदना फुले आणि मोठ्या प्रमाणात वाचक वर्ग उपस्थित होते .

# विकासाच्या मुद्द्यावर मी ही लढाई जिंकलो-आ.प्रशांत बंब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गंगापुर । प्रतिनिधी**

गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघांमध्ये अत्यंत चुरशीची लढत बघायला मिळाली यामध्ये आमदार प्रशांत बंब यांनी ५५०९ एवढ्या मतांनी विजयी झाले आहेत. संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागलेल्या गंगापूर खुलताबाद विधानसभेच्या निवडणुकीत कोण विजयी होणार याविषयी तर्कवितर्क लावले जात होते. सकाळी आठ वाजता प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर आठव्या फेरीपर्यंत खुलताबाद मधून पदवीधरचे आमदार सतीश चव्हाण यांनी ४ हजाराची आघाडी घेतली होती. परंतु गंगापूर मतदार संघ चालू होतात आमदार प्रशांत बंब यांनी २७ व्या फेरीपर्यंत ५५०९ एवढी आघाडी घेऊन गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदार संघात विजय संपादन केले. याप्रसंगी कार्यकत्र्यांनी एकच जल्लोष साजरा केला. प्रशांत बंब हे भाजपचे औरंगाबाद छत्रपती

संभाजी नगर जिल्ह्यातील गंगापूर विधानसभा मतदारसंघातील आमदार आहेत. तरुण तडफदार, आक्रमक आणि अभ्यासू आमदार म्हणून त्यांची ख्याती आहे. भाजपचे गंगापूर विधानसभा आमदार आहेत. तरुण तडफदार, अभ्यासू आमदार म्हणून त्यांची घरात कोणतीही राजकीय राजकारणात येऊन सलग चौथ्यांदा निवडणूक बंब यांनी जिंकली. स्वतःला सिद्ध केलं. हे कसं घेतलेला हा आढावा. प्रशांत बंब राजकीय पाश्र्वभूमी नाही. त्यांनी राजकारणात प्रवेश केला राजकारणात आल्यावर त्यांना आणि त्यांचं नेतृत्वही तयार लासूर स्टेशन ग्रामपंचायत सरपंच, जिल्हा परिषद सदस्य जिल्हा परिषदेच्या अर्थ व सभापतीपद आदी पदे त्यांनी भूषविली आहेत. स्थानिक प्रशासनाचा अनुभव असल्यानेच राज्य स्तरावर काम करताना त्याचा त्यांना फायदा होतो.२००९, ३०१४ आणि २०१९ व २०२४ मध्ये ते सलग चार वेळा विधानसभेवर निवडून आले आहेत. मतदारसंघातील नागरिकांशी सातत्याने असलेला संपर्क, कार्यकत्र्यांची मजबूत फळी उभारण्यात आलेलं यश, सर्वांच्या सुखादुखात धावून जाणे आणि मनमिळावूपणा यामुळे ते आपला मतदारसंघ राखू शकले आहेत. हेच त्यांच्या यशाचं गमक आहे. विशेष म्हणजे गंगापूर विधानसभा मतदारसंघात हॅट्रीक साधण्याचा विक्रमही त्यांनी केला.आणि आता चौथ्यांचा निवडून आलेले आहेत.प्रशांत बंब हे मतदारसंघातील आक्रमक आणि ख्याती आहे. पाश्र्वभूमी नसताना विधानसभेची तसेच राजकारणात घडलं? याचाच यांना कोणतीही एमबीए झाल्यानंतर . विशेष म्हणजे यश मिळत गेले झालं. २००२ मध्ये सदस्य, उपसरपंच, , २००५ मध्ये बांधकाम समितीचे प्रशांत बंब सलग दुसऱ्यांदा निवडून आल्यानंतर २०१४ मध्ये राज्यातील फडणवीस सरकारमध्ये त्यांचा समावेश होईल असं बाटत्त होतं. मात्र, बराच कालावधीनंतर राज्यात भाजपची सत्ता आली होती. त्यामुळे मंत्रिमंडळात नव्या जुन्या नेत्यांची मोट बांधणं आवगयक होतं. त्यातच शिवसेना मित्रपक्ष असल्याने सेनेकडे काही मंत्रिपदं गेली.

# मुला-मुलींनी मैदानी खेळाची आवड जोपासण्याची गरज-नमिता फिरोदिया

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**




फुटबॉल खेळाला चालना व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने शहरातील नगर क्लबच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग स्पर्धेचे उद्घाटन ललिता प्रकाश फिरोदिया यांच्या हस्ते झाले. दिवस-रात्र रंगणाऱ्या लीग कम नॉकआऊट फुटबॉल सामन्यांच्या थरारचे प्रारंभ झाले आहे. या स्पर्धेचे हे तीसरे पर्व आहे.

नमोह फुटबॉलच्या नमिता फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झालेल्या फुटबॉल स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संघ मालक दर्शन भंडारी (जीसी फायटर्स), सागर कायगावकर (एसजीके गोल्ड स्टार), जोएब खान (गुलमोहर चॅलेंजर्स), अभिनंदन भन्साळी (अवित्री वेलोसिटी किंग्स), प्रणिल मुनोत (कॉन्प्लेक्स सुपर हीरो), चेतन गांधी (गांधी वॉरीअर्स), ऋतविक वाबळे (आरडीएक्स ज्युनियर), आशिष तोट्टू (एक्सलन्स अचिव्हर्स) आदींसह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नमिता फिरोदिया म्हणाल्या की, मुला-मुलींनी मैदानी खेळाची आवड जोपासण्याची गरज आहे. लहान मुलांमधून उत्कृष्ट फुटबॉल खेळाडू घडविण्यासाठी शहरात नमोह फुटबॉल क्लब कार्यरत आहे. विविध प्रशिक्षण शिबिर व स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंचा चालना देण्याचे कार्य सुरु आहे. स्पर्धेच्या माध्यमातून चांगले खेळाडू पुढे येत असून, त्यांना पुढे जाण्यासाठी पाठबळ दिले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने १५ वर्षा खालील शहरातील शंभर उत्कृष्ट खेळाडूंना स्पर्धेसाठी निवडण्यात आले. ८ संघ मालकांनी या खेळाडूंची आपल्या संघात निवड केली. या ८ संघात ही स्पर्धा सुरु असून, सकाळ व संध्याकाळच्या सत्रात फ्लड लाईटमध्ये फुटबॉल सामन्यांचे रंगातदार सामने होत आहे.

उद्घाटनाच्या प्रारंभी खेळाडूंनी मैदानातून उत्कृष्ट संचलन केले. याप्रसंगी संघाचे प्रशिक्षक ऋषी पाटोळे, मयूर टेमक, प्रसाद पाटोळे, प्रणय रागिनवार, सिध्दार्थ चौहान, सौरभ चौहान, रोहन कुकरेजा, अक्षय बोऱ्हाडे आदी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सिध्दार्थ वांद्रे व ऋतिक चौहान परिश्रम घेत आहे.

या स्पर्धेसाठी खेळाडूंच्या किटचे प्रायोजकत्व केपीसी ज्वेलर्स यांनी स्विकारले आहे. तर स्पर्धेसाठी संघाचे प्रायोजकत्व गुलाबचंद कार्पेटवाला, एस.जी. कायगावकर, गुलमोहर स्पोर्टस क्लब, अवित्री बाईक्स, कॉन्प्लेक्स स्मार्ट थेटर, प्रॉस्पौरा, एजीडब्ल्यू ग्रुप, एक्सलन्स क्लासेस यांचे लाभले आहे. सह-प्रायोजक राम एजन्सी व फन की लॅण्ड हे आहे.

# हे शब्द आज माझे झाले मुके तरीही ते बोलतील भाषा हमखास वादळाची

## अमृतमहोत्सवी संविधान दिन निमित्ताने डॉ. विजयकुमार कस्तुरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जळगाव । ज्ञानेश्वर बुधवत**

दोन वर्षे अकरा महिने अठरा दिवसांच्या प्रदिर्घ संशोधनात्मक अध्ययनशील परिश्रमानंतर भारता सारख्या खंडप्राय व सर्व धर्म संस्कृतीचे वास्तव्य असलेल्या देशासाठी शिल्पाकारलेले ' भारतीय संविधान ' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या घटना सभेला ते सुपूर्द करण्याला व घटना समितीने ते स्विकारण्याच्या त्या दि. २६ नोव्हेंबर, १९४९ च्या पावन क्षणाच्या अमृतमहोत्सवी समारंभाच्या निमित्ताने जळगाव जिल्हा येथील, सामाजिक न्याय भवनमध्ये, बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स ( बाजार ), म. फुले रा. शाहू डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य मंच, जळगाव आणि सामाजिक न्याय विभाग, जळगाव जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य राज्यस्तरीय कवी




संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना आपल्या वक्तव्यामधून, कित्येक दशकांच्या सामाजिक समर्पित सेवेस्तव विविध राष्ट्रीय तथा अंतर्राष्ट्रीय पुरस्कारासह साऊथ वेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली, बुलढाणा, राष्ट्रीय कार्यकारी उपाध्यक्ष, केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली यांनी वरील प्रमाणे निवेदन करून उपरोक्त सर्व महामानवांना व भारतीय संविधानास आपल्या काव्यगायनातून मानवंदना दिली. या अभिनव सोहळ्याला मा. भगवान भटकर, मा. कार्यक्रम अधिकारी, जळगाव आकाशवाणी, तथा मा. भरत शिरसाठ, महासचिव, बौद्ध साहित्य परिषद, महाराष्ट्र यांची तथा बानाईचे अध्यक्ष मा. आर. जे. सुरवाडे यांच्या सह ज्येष्ठ साहित्यिक तथा समर्पक कथाकारीसाठी अमेरिकन मानद डॉक्टर ऑफ लिटरेचर पदवी प्राप्त डॉ. बबनराव महामुने,संभाजीनगर ( औरंगाबाद ), ज्येष्ठ समाजसेवक म्हणून अमेरिकन डॉक्टरेट पदवी प्राप्त कवी डॉ. डी. व्ही. खरात, सचिव, नागसेन क्रिडा व सांस्कृतिक समिती, चिखली, बुलढाणा, शाहीर इश्वर वाघ, ज्येष्ठ पत्रकार सोपान भवर इ. मान्यवर व ज्येष्ठ कवी साहित्यिक निमंत्रित होते.

याप्रसंगी भारतीय संविधान दिना संदर्भाचे औचित्य साधून मान्यवरांनी आपले विचार मांडले. तसेच ज्येष्ठ कवयित्री ज्योती वाघ तथा शहानूर मॅडम, कवी सुशांत मेढे, मनोहर तायडे, जळगाव, मा. सोनडवले, नागपूर इत्यादी उपस्थित सर्व मान्यवर कवींनी भारतीय संविधानावरील आपापल्या सुरेख गझल-रचना सादर करून संविधान सोहळ्यात चैतन्य निर्माण केले.

## संविधान दिन साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । प्रतिनिधी**

माहूर तालुक्यातील हिंगणी येथील जि.प. उच्च प्राथमिक शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेचे पूजन करून अभिवादण करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बी.ए.पाटील, शिक्षक एन. एल. होळगे, एस. एस. कोनाळे, डी. पी. शिंदे,शुभम जयस्वाल, धीरज इंगोले, दिगांबर डुकरे, देविदास नरवाडे आदी उपस्थित होते.

## भारतीय संविधान दिना निमित्त एमपीजे चे उद्देशिका वाचून संविधान दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

उमरखेड मुव्हमेन्ट फॉर पिस न्ड जस्टिस (एमपीजे) या संघटने तर्फे दर वर्षी प्रमाणे याही वर्षी २६ नोव्हे (संविधान दिवस ) ते २६ जाने (प्रजासत्ताक दिन ) पर्यंत संविधान सर्वासाठी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत आज २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिना निमित्त सकाळी १० वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोर संविधान उद्देशिके च्या वाचनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे . यात सर्व संविधान प्रेमी - सामाजिक संघटना - नागरीकांनी सहभाग घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. या वेळी अनेक कार्यकर्तांनी संविधाना विषयी आपले विचार व्यक्त केले. सुत्रसंचलन सामाजिक कार्यकर्ते प्रा. गजानन दामोदर



यांनी तर आभार प्रदर्शन एमपीजे शहराध्यक्ष मोहसीन राज यांनी केले.या प्रसंगी व्ही एच हनवते ,उत्तम बरवड , देवानंद मोरे,आत्माराम हापसे, पत्रकार सिद्धार्थ दिवेकर, प्रा .गजानन दामोदर, गजानन भालेराव,वैशाली कवडे मोनिका पाईकराव, जयभिम गायकवाड, प्रकाश वाघमारे, गोविंदराव दरणे ,प्रफुल दिवेकर,अनिल मांगुळकर, हाफीज अन्सार,मोहसीन राज,डॉ फारुक अबरार, इरफान खान ,प्रकाश चव्हाण,देविदास शेवाळे ,धम्मानंद काळबांडे, सैय्यद रजा, अ.जहीर, समीर अहेमद तसेच विविध सामाजिक संघटना, पक्ष, पत्रकार,संविधान प्रेमी नागरिक उपस्थित होते. एमपीजे च्या २६ जानेवारी पर्यंत राबविण्यात येणाऱ्या अभियानात सर्व नागरिकांनी सहभाग व सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा सचिव हाफीज अन्सार हुसैनी यांनी केले होते.

## जिजाऊ ज्ञानमंदिर स्टार एज्यूकेशन अवार्ड २०२४ ने सन्मानित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड, सन २०१० पासून कार्यरत असलेल्या जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल ने मुखेड शहरातच नव्हे तर पंचक्रोशीत आपल्या शैक्षणिक कार्याचा व निकालाचा चढता आलेख ठेवत एक वेगळा ठसा उमटवला आहे. गेल्या वीस वर्षापासून शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व मुख्याध्यापक तथा सचिव जगदीप जोगदंड यांनी केलेले कार्य सर्वांचे आकर्षण असून सर्वांगसुंदर निसर्गशाळा म्हणून जिजाऊ ज्ञानमंदिर देखणी शाळा तर आहेच पण येथील विद्यार्थी गुणवंत ,यशवंत प्रगतीशील आहेत. जे की आपल्या बुद्धिमतेच्या बळावर बेसिक नॉलेज घेवून खखढ, इंजिनिअर , डॉक्टर ,क्लास वन अधिकारी पदापर्यंत पोहचून यशस्वीपणे कार्यरत आहेत. यशस्वी विद्यार्थी हेच या शाळेची खरी कमाई आहे. याच शैक्षणिक कार्याची दखल घेवून शाळेला यापूर्वीही अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. यावर्षीही मुंबई येथे आयोजित शैक्षणिक फेअर मध्ये एडऋए आयोजित स्टार एज्युकेशन अवार्ड २०२४ चा बेस्ट स्कूल अवार्ड जिजाऊ ज्ञानमंदिर मुखेड ला भव्य अशा कार्यक्रमात देऊन सन्मानित करण्यात आले आहे. संस्थेचे कोषाध्यक्ष जगदीश जोगदंड यांनी हा पुरस्कार सन्मानपूर्वक स्वीकारला. संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड यांनी हा पुरस्कार सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी , मुख्याध्यापक यांना समर्पित केला आहे. पालकांचा शाळेविषयी असलेला विश्वास , विद्यार्थ्यांची मेहनत यामुळेच हा पुरस्कार सर्वांच्या प्रयत्नांमुळे शाळेला मिळाला आहे. याबद्दल सर्वत्र शाळेचे कौतुक होत आहे.



औद्योगिक प्रशिक्षण संस्था माहूर. जि.नांदेड येथे दि.२६.नोव्हेंबर रोजी संविधान दीना निमित्त संविधान निर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान उद्देशीकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिन साजरा करण्यात आला.या वेळी उपस्थित कर्मचारी वृंद.

# मा.खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या समर्थकांनी केला उस्माननगर मध्ये जल्लोष

## वारकड गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली आनंदोत्सव जल्लोष साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

संपूर्ण राज्यांचे लक्ष लागलेल्या व बहुचर्चित असलेल्या लोहा विधानसभेचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला . या आतितटीच्या व प्रतिष्ठ्याच्या निवडणुकीत माजी खासदार तथा लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर प्रचंड मतांनी विजयी झाल्याबद्दल उस्माननगर येथील भाजपा राष्ट्रीय सदस्य तथा ज्येष्ठ कार्यकर्ते तुकाराम वारकड गुरूजी यांच्या नेतृत्वाखाली गुलालाची उधळण व फटक्यांची आतिशबाजी करून विद्यमान आमदार लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला .

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील लढतीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले होते कारण प्रतापराव पाटील चिखलीकर यांची सखी बहीण सौ. आशाबाई श्यामसुंदर शिंदे यांनी आवाहन दिले होते. त्यामुळे या ठिकाणी विधानसभेला बहिण विरुद्ध भाऊ असा सामना रंगला होता. मात्र मतदारसंघात मात्र बहीण विरुद्ध भाऊ लढत झालीच नाही. बहिण भाऊ असलेल्या आशाबाई शिंदे आणि प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यात राज्यात अतितटीची लढत म्हणून या मतदारसंघाकडे पाहिले जात होते. चिखलीकर यांचा गड असलेल्या मतदारसंघ काबीज करण्यात चिखलीकर यशस्वी ठरल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पसरले आहे. लोहा-कंधार कंधार विधानसभेच्या अतितटीच्या लढतीमध्ये महायुतीचे उमेदवार माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे तिसऱ्यांदा आमदार म्हणून उस्माननगर येथून जास्त मताधिक्याने निवडून आल्या बद्दल व विजयी झाल्यामुळे ( राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गट )व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी व उस्माननगर तालुका कंधार येथील बस स्टँड चौकात तु.श वारकड गुरूजी (भाजपा राष्ट्रीय कार्यकारिणी





सदस्य) यांच्या नेतृत्वाखालील फटक्यांची आतिषबाजी करित गुलालाची उधळण करीत डि जे च्या तालावर आनंदोत्सव साजरा करण्यात आला .

माजी खासदार तथा लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर यांची तिसऱ्यांदा लोहा-कंधार विधान सभेचे आमदार झाल्याबद्दल प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कट्टर समर्थक वैजनाथ पाटील घोरबांड ( माजी सरपंच) माधवराव भिसे ( जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी ) , संजय उर्फ रूद्र वारकड ( भाजपा युवा तालुका सरचिटणीस तथा ग्रामपंचायत सदस्य) , आमिन आदमनकर ( माजी सरपंच) ,शिवशंकर काळे ( भाजपा पंचायतराज व ग्रामविकास विभाग मराठवाडा सह -संयोजक , तथा ग्रामपंचायत सदस्य) बाबुराव पाटील घोरबांड, शेषेराव पाटील काळम ( सरपंच प्रतिनिधी) , बालाजी रावण घोरबांड , बी.पी.घोरबांड , सुमित देशपांडे , रामदास सोनटक्के ,वैज , शिवराज शेकापूरे ( लाठकर), माणिक ( पप्पू) काळम , बसवेश्वर वारकड , आर.आर. पाटील घोरबांड ,सलीम शेख व हानमंत मोरे , आनंदराव पाटील घोरबांड , अंबादास कांबळे , बालाजी ना.घोरबांड , गोरे , होळगे , आगाशे , डांगे , कृष्णा भिसे , यांच्या सहीत माजी खासदार तथा विद्यमान आमदार लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर कार्यकर्त्यांनी डि जे च्या निनादात गुलाल उधळून व घोषणा देऊन फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव जल्लोष साजरा करण्यात आला.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904